RNI No. MAHBIL /2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–क

वर्ष ४, अंक २५] बुधवार, मे ३०, २०१८/ज्येष्ठ ९, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ४०

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१८.**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/प्रशा/२०१८/०६७३.—विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ आणि कलम ९१ च्या उप-कलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे विनियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ.—**(एक) या विनियमांना " महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१८ " असे म्हणावे.

(दोन) हे विनियम शासकीय **राजपत्रातील** त्यांच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ च्या विनियम ३(१)(२) मध्ये खालील परंतुकांची भर घालण्यात येईल, म्हणजेच :—

" परंतु असे की, एकाच स्त्रोतातून निवड केवळ अपवादात्मक प्रकरणांमध्ये करण्यात येईल, जेथे सल्लागारांनी पूर्वी केलेल्या कामात नैसर्गिक सातत्य राखण्यासाठी अशी निवड उचित आणि स्पष्टपणे लाभदायक ठरत असेल किंवा जेथे काल-मर्यादेमुळे तातडीने नियुक्ती करणे आवश्यक असेल, किंवा अशा कामांसाठी जेथे व्यक्तिगत सल्लागारास सलगपणे (मासिक रेटेनरशिप तत्वावर) कामे देण्यात येतात, परंतु अशा व्यक्तिगत सल्लागाराला द्यावयाचे शुल्क दरमहा रु. १.५ लाखापेक्षा जास्त नसते किंवा जेथे केवळ एक व्यक्ती किंवा एक कंपनी असे काम करण्यासाठी प्रख्यात असेल आणि अशा कामातील त्याचे नैपुण्य सिद्ध झालेले असेल ; मात्र अशी नियुक्ती करताना त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करणे आवश्यक राहील. "

**अश्वनी कुमार सिन्हा,**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक २४ मे २०१८.

## MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION, MUMBAI

### Maharashtra Electricity Regulatory Commission (Terms and Conditions of Appointment of Consultants) (First Amendment) Regulations, 2018

ELECTRICITY ACT, 2003.

No. MERC/Admin/2018/0673.—In exercise of the powers conferred under section 181 and sub-section (*4*) of section 91 of the Electricity Act, 2003 and all other powers enabling it in this behalf, the Maharashtra Electricity Regulatory Commission hereby makes the following Regulations to amend the Maharashtra Electricity Regulatory Commission (Terms and Conditions of Appointment of Consultants) Regulations, 2004.

**1.** *Short Title and Commencement*.—(*i*) These Regulations may be called the Maharashtra Electricity Regulatory Commission (Terms and Conditions of Appointment of Consultants) (First Amendment) Regulations, 2018.

(*ii*) These Regulations shall come into force from the date of their publication in the *Official Gazette*.

**2.** In Regulation 3 (*I* ) (*ii*) of the Maharashtra Electricity Regulatory Commission (Terms and Conditions of Appointment of Consultants) Regulations, 2004, the following proviso shall be added, namely :—

> " Provided that single source selection shall be resorted to only in exceptional cases where it is appropriate and represents a clear advantage because the tasks represent a natural continuation of previous work carried out by the Consultants, or where immediate appointment is essential because of the time limit involved, or for assignments where tasks are assigned to an individual consultant on a continual basis (monthly retainer basis), provided that the fee payable to such individual consultant does not exceed Rs. 1.5 lakh per month, or where one person or one company is well renowned and has proven expertise for the task, subject to the condition that the reasons for such appointment are recorded in writing."

ASHWANI KUMAR SINHA,
Secretary,
Maharashtra Electricity Regulatory Commission.

Mumbai,
Dated the 24th May 2018.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.